शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com


# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालना शहर महानगरपालिकेत शिवसेना गटनेते व प्रतोदची अधिकृत निवड

## गटनेतेपदी दीपक राठोड तर प्रतोदपदी दुर्गेश काठोठीवाले



**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिकेतील शिवसेना पक्षाच्या वतीने महत्त्वपूर्ण संघटनात्मक निर्णय घेण्यात आला असून, शिवसेना गटनेतेपदी दीपक रवीशंकर राठोड यांची तर शिवसेना पक्षाच्या प्रतोदपदी दुर्गेश किसनलाल काठोटीवाले यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे.

ही निवड आज संभाजीनगर येथे शिवसेना पक्षाचे विभागीय आयुक्त यांच्यासमोर पार पडली. शिवसेना उपनेते अर्जुनराव

खोतकर संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे व आसाराम बोराडे यांच्या आदेशानुसार ही संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात आली.

या प्रसंगी शिवसेना पक्षाचे जालना शहर महानगरपालिकेतील नगरसेवक सौ.दर्शना विजय झोल, दीपक राठोड, पक्षप्रतोद दुर्गेश काठोटीवाले अमोल ठाकूर ,कमलेश खरे, संगीर पहेलवान,सौ.उषाताई अशोकराव पांगारकर सौ. सत्यभामा विजय जाधव,सौ. पुजा दिनेश भगत,सौ सौ. पुजा योगेश भगत यांच्यासह शिवसेना शहर संघटक दिनेश भगत किशोर पांगरकर योगेश भोरे सिद्धार्थ अंभोरे,व शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पक्ष संघटना अधिक सक्षम, शिस्तबद्ध व प्रभावीपणे व्हावी या उद्देशाने या नियुक्त्या करण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

नवनियुक्त गटनेते दीपक राठोड व प्रतोद दुर्गेश किसनलाल काठोटीवाले यांच्या नियुक्तीमुळे महानगरपालिकेतील शिवसेनेची भूमिका अधिक ठाम व आक्रमक राहील, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला. शहराच्या विकासात्मक प्रश्नांसाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी शिवसेना प्रभावीपणे आवाज उठवेल, असे मत यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केले. या निवडीबद्दल सर्वांचे आमदार अर्जुनराव खोतकर, शिवसेना नेते भास्करराव अंबेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, आसाराम बोराडे तसेच विष्णू पाचफुले यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन केले.

जालना शहरातील शिवसेना संघटना अधिक बळकट होण्याच्या दृष्टीने ही निवड महत्त्वाची मानली जात असून, आगामी काळात महानगरपालिकेत शिवसेना अधिक प्रभावीपणे काम करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### पेगर गव्हाण आदर्श गाव करण्याचा नवयुवक तरुण मित्र मंडळाचा निर्धार

## पर्यावरण संवर्धनासाठी ३०० वृक्षांची लागवड; युवकांच्या विधायक उपक्रमांना सुरुवात

**परभणी । प्रतिनिधी -** आजच्या काळात बहुतांश युवक व्यसनाधीनता, बेरोजगारी व दिशाहीनतेच्या गर्तेत अडकत असताना, परभणी जिल्ह्यातील पेगर गव्हाण येथील नवयुवक तरुण मित्र मंडळाने सकारात्मक व प्रेरणादायी पाऊल उचलत गावाला आदर्श गाव बनविण्याचा निर्धार केला आहे. या संकल्पनेची सुरुवात जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात ३०० वृक्षरोपांची लागवड करून करण्यात आली असून, पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे.



पेगर गव्हाण येथील होतकरू, ध्येयवेडे व समाजाभिमुख तरुण एकत्र येत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजूट झाले आहेत. युवकांनी केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित न राहता, गावातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक परिवर्तनासाठी विविध दीर्घकालीन उपक्रम राबविण्याचा संकल्प केला आहे.

मंडळाच्या वतीने गावात वाचनालयाची स्थापना, व्यायामशाळा सुरू करणे, जिल्हा परिषद प्रशालेची नियमित देखभाल व दुरुस्ती, तसेच गरीब, होतकरू व गुणवान विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विक्रमी उत्पादन घेणाऱ्या परिश्रमशील शेतकरी व कष्टकऱ्यांचा गौरव करून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देण्यात येणार आहे.

गावातील युवकांनी वामाचाराला फाटा देत सदाचार, शिस्त व सेवाभावाची वाटचाल स्वीकारली पान २ वर

## इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बदनापुरचे प्रा. फोके यांना पीएच.डी. (फार्मसी) पदवी

**बदनापूर । प्रतिनिधी -** बदनापूर येथील पाथ्रीकर कॅम्पस येथील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे कार्यरत असलेले प्रा.संदीप विश्वनाथ फोके यांनी सनराईज विद्यापीठ,अलवर (राजस्थान) येथून डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) फार्मसी ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी यशस्वीरीत्या प्राप्त केली आहे.



३० जानेवारी त्यांनी आपला संशोधन प्रबंध यशस्वीपणे सादर केला. त्यांच्या संशोधनाचा विषय ‘इम्प्रुव्हमेंट ऑफ फार्माको-कायनेटिक्स पॅरामिटर्स बाय फॉर्म्युलेटिंग अँड कॅरॅक्टरायझेशन ऑफ सेल्फ इमल्सिफायिंग ड्रग डिलिव्हरी सिस्टीम फॉर ओरल डिलिव्हरी ऑफ लिपोफिलिक ड्रग’ असा असून, औषधांच्या शरीरातील शोषण क्षमता (बायो-अव्हेलेबिलिटी) वाढवणे, औषधांची परिणामकारकता सुधारणे तसेच तोंडावाटे दिल्या जाणाऱ्या लिपोफिलिक (तेलकट स्वरूपातील) औषधांच्या वितरण प्रणालीत सुधारणा करणे, हा या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. या संशोधनाद्वारे सेल्फ इमल्सिफायिंग ड्रग डिलिव्हरी सिस्टीम (स्वतःहून इमल्शन तयार करणारी औषध वितरण प्रणाली) विकसित करून तिचे फॉर्म्युलेशन (संयोजन) व कॅरॅक्टरायझेशन (वैशिष्ट्ये व गुणवत्ता तपासणी) यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. हे संशोधन भविष्यात फार्मसी, औषधनिर्मिती व वैद्यकीय उपचार पद्धतींसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या यशाबद्दल पाथ्रीकर कॅम्पसचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर, विद्या चित्रे, डॉ.सुनील जायभाये, अनिल सपकाळ, बाबासाहेब बनसोड, कल्याण देवकते, पान २ वर

## जालना जिल्ह्यात कुपोषण निर्मूलनासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कुपोषणाचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी महिला व बालविकास विभागासह आरोग्य, शिक्षण, पंचायत राज, एकात्मिक बालविकास सेवा योजना () तसेच स्वयंसेवी संस्थांनी परस्पर समन्वयाने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. एम. मिन्नू, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती कोमल कोरे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गजानन म्हस्के, डॉ. रघुवीर चंदेल, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल सोनी, मुख्यमंत्री फेलो साक्षी उगले यांची उपस्थिती होती.

जालना जिल्ह्यातील कुपोषण, माता मृत्यू व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे,गरोदर,स्तनदा माता व 0 ते ५ वयोगटातील मुलांना पौष्टिक आहार देण्यासोबतच त्यांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास साधण्यासाठी जिल्हा प्रशासन व हेल्थ स्पोकन ट्युटोरियल आणि विल्स ग्लोबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या जालना मिशन न्युट्रीशन कार्यक्रमाअंतर्गत आज दि. ३0 जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य विभाग व महिला व बालकल्याण विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित विशेष प्रशिक्षणा दरम्यान त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, कुपोषण हा केवळ एका विभागाचा प्रश्न नसून तो सामाजिक प्रश्न आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपली भूमिका ओळखून कार्य करणे आवश्यक आहे. गर्भवती व स्तनदा मातांना वेळेवर पोषण आहार, नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण, तसेच पालकांमध्ये जनजागृती करण्यावर भर द्यावा. तसेच, अंगणवाडी सेविकांनी नियमित वजनमापन, वाढ नोंदवही अद्ययावत ठेवणे, पोषण विषयक मार्गदर्शन देणे व घरभेटींची प्रभावी




अंमलबजावणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. कुपोषणमुक्त जालना जिल्हा हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून सर्व यंत्रणांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

या प्रशिक्षणात हेल्थ स्पोकन ट्युटोरियल आणि विल्स ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने कुपोषण, माता मृत्यू व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे,गरोदर,स्तनदा माता व 0 ते ५ वयोगटातील मुलांना पौष्टिक आहार या विषयावर १०४ विषयांवर त्या त्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तज्ञ मार्गदर्शकांचे ॲनिमेटेड व्हिडिओंचा समावेश आहे.सदरील व्हिडिओ मध्ये गर्भवती मातांनी गर्भधारणा कालावधीत आहार विषयक कशी काळजी घ्यावी, शास्त्रोक्त पद्धतीने बाळाला स्तनपान कसे करावे, 0 ते ५ वयोगटातील मुलांना कुठला पुरक व पौष्टिक आहार द्यावा यासह अन्य विषयांचा समावेश आहे. सर्वप्रथम आरोग्य आणि महिला व बालविकास विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी या व्हिडिओंचा परिपूर्ण अभ्यास करावयाचा आहे. त्यानंतर यावर आधारित सर्व कर्मचारी यांची १00 गुणांची लेखी परीक्षा घेउन त्याद्वारे १000 कर्मचारी पान २ वर

## माणसाच्या मनाला जोडण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते - डॉ सोमनाथ खाडे



**जालना । प्रतिनिधी -** माणसाच्या मनाला जोडण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते, राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे राष्ट्राची सेवा करणारी युवकांची संघटना होय असे प्रतिपादन मांडवा येथे जेईएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विशेष श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी विद्यापीठ समन्वयक प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा (ता.बदनापूर,जि. जालना) येथे दिनांक २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ समन्वयक प्रा.डॉ. सोमीनाथ खाडे होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते, व्यासपीठावर मांडवा येथील सरपंच श्री.भीमराव मस्के उपसरपंच श्री.सदाशिव सोलाट बद्रीनारायण बालवाले विद्यालयाचे संचालक श्री. विठ्ठलराव सोलाट, मुख्याध्यापिका श्रीमती अंजली सोलाट यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्वच्छतेचे धूत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून शिबिराचे उद्घाटन विद्यापीठ समन्वयक प्रा.डॉ. सोमीनाथ खाडे यांच्या यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले. विशेष पान २ वर

### कामगार विभागाची बैठक संपन्न

## जालना जिल्हा बाल कामगार मुक्त करण्यासाठी कामाची गती वाढवावी - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील कामगारांना शासनाच्या विविध सवलतीचा लाभ वेळेवर मिळणे गरजेचे आहे. कामगारांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी सर्वांनी अधिक गतीने प्रयत्न करावेत. तसेच जिल्ह्यातील वीटभट्टी, हॉटेल, ढाबा, गॅरेज आदिसह बाल कामगार असलेल्या आस्थापनांना वेळोवेळी भेटी देवून बाल कामगार आढळुन आलेल्या ठिकाणी नियमानूसार कारवाई करावी. जिल्ह्यात बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी कोणतेही कारण न देता जालना जिल्हा बाल कामगार मुक्त करण्यासाठी कामाची गती वाढवा, अशा स्पष्ट सुचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बेठबिगार समिती, बालकामगार समिती आणि असंघटीत कामगार समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा कामगार अधिकारी अमोल जाधव यांच्यासह समितीचे सदस्य व संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यात बाल मजूरी थांबवून देशाचे भविष्य वाचवणे अत्यंत गरजेचे आहे. असे सांगून कामगारांच्या कल्याणासाठी कामगार कार्यालय काम करत आहे, त्यामुळे जिल्ह्यातील कोणताही कामगार शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनेपासून वंचित राहता कामा नये. जिल्ह्यातील कामगारांच्या जनजागृतीसाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून दृकश्राव्य चित्रफीत शेअर करुन मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. जेणेकरुन संबंधितांना लाभ देणे सोयीचे होवून खरा कामगार फसवणूक होण्यापासून वाचू शकेल.




तालुकास्तरावर असलेल्या सुविधा केंद्रावर नियंत्रण ठेवा, तिथे काम कसे चालत आहे याची माहिती वेळोवेळी भेट देवून घ्यावी. कामगारांसाठी असणाऱ्या योजनेतून भांडे वाटप करतांना पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. तरी त्याचे निराकरण वेळेत करा, अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. कामगार विभागाच्या कामाबाबत असमाधानी असल्याचेही सांगून त्यांनी विभागाच्या एकंदरीत कामाबद्दल नाराजी व्यक्त केली. यावेळी समिती सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यात आली.

## संपादकीय पान

# विमान दुर्घटना चिंताजनक

२८ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाला झालेल्या भीषण अपघातात त्यांचे दुर्दैवी निधन झाले. अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. त्यांच्यासारखा विकासाची दृष्टी असलेला नेता विमान अपघाताने हिरावून घेतल्याने महाराष्ट्र काही वर्ष मागे गेला. त्यांचे निधन ही महाराष्ट्रासाठी मोठी हानी आहे. अर्थात विमान अपघातात मृत्यू झालेले अजितदादा हे पहिले नेते नाहीत याआधीही अनेक नेत्यांना विमान अपघाताने हिरावून नेले आहे. मागील वर्षी जून महिन्यात सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ - ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या भीषण अपघाताने देखील सर्वांचेच मन हेलावले होते. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला होता. दोन वर्षापूर्वी जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान कोसळून भीषण अपघात झाल होता. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६0 हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. अजितदादांच्या विमानाला झालेल्या अपघाताचे कारण शोधण्याची विनंती महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे. या अपघाताची सखोल चौकशी लवकरच होईल आणि त्यात या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सिद्ध झाले आहे. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवत असतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७0 पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. आपल्या देशातही विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमवावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी, गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता अजितदादा पवार यांच्या नावाचीही भर पडली आहे. चार वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## चांदी ८५ हजार तर सोन्यात २५ हजारांची घसरण

**मुंबई -** सोने आणि चांदीच्या दरातील तेजीला मोठा ब्रेक लागला आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर २४ तासात चांदीच्या दरात ८५ हजार रुपयांची घसरण झाल्याचं पाहायला मिळालं आहे. एमसीएक्सवर सोन्याच्या दरात २५ हजार रुपयांची घसरण झाल्याचं दिसून आलं. एमसीएक्सवर काल चांदीच्या वायद्याचे दर ४२0000 च्या उच्चांकावर पोहोचले होते. २४ तासात चांदीचे दर ८५000 रुपयांनी कोसळले आहेत. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर गुरुवारी चांदीच्या दरानं ४२0000 चा उच्चांक गाठला होता. तर, सोन्याचे दर २ लाखांच्या जवळ पोहोचले होते. शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजता १ किलो चांदीच्या वायद्याचे दर ३३५00१ रुपयांवर पोहोचले आहेत. गुरुवारी चांदीनं ४२00४८ रुपयांचा उच्चांक गाठला होता. म्हणजेच २४ तासात चांदीचे दर ८५000 रुपयांनी कमी झाले. सोन्याच्या दरात देखील मोठी घसरण झाली आहे. एमसीएक्सवर सोन्याच्या वायद्याचे दर १९३0९६ रुपयांच्या उच्चांकावर पोहोचले होते. त्यात २४ तासात २५५00 रुपयांची घसरण झाली आहे.

# हुंडा देणे गुन्हा ठरणार नाही? केरळ सरकारच्या नव्या प्रस्तावाने देशभरात चर्चेला उधाण!

हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ अंतर्गत हुंडा देण्याचे कृत्य गुन्हा ठरवण्यापासून वगळण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव केरळ राज्य कायदा सुधारणा आयोगाने दिला असल्याची माहिती राज्य सरकारने केरळ उच्च न्यायालयासमोर सादर केली आहे. या प्रस्तावामुळे हुंडाविरोधी कायद्याच्या मूळ हेतूवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, देशभरातील विधी क्षेत्रात यावर तीव्र चर्चा सुरू झाली आहे. पीडित महिलांना तक्रार करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने हा बदल प्रस्तावित असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

मुख्य न्यायमूर्ती सौमेन सेन आणि न्यायमूर्ती श्याम कुमार व्ही. एम. यांच्या खंडपीठासमोर एका जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान ही माहिती देण्यात आली. केरळ हुंडा प्रतिबंधक नियम, २00४ च्या नियम ५ अंतर्गत दाखल झालेल्या तक्रारींवर झालेल्या कारवाईबाबत उत्तरदायित्व निश्चित करण्याची मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे. सरकारच्या या नव्या भूमिकेमुळे या प्रकरणाला एक अनपेक्षित वळण मिळाले आहे.

सध्याच्या कायद्यानुसार, वधू किंवा वराच्या पक्षाकडून लग्नापूर्वी, लग्नाच्या वेळी किंवा लग्नानंतर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दिली जाणारी कोणतीही मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तू हुंडा म्हणून गणली जाते आणि तो देणे व घेणे दोन्हीही दखलपात्र गुन्हा आहे. मात्र, प्रस्तावित मसुदा दुरुस्तीनुसार केवळ वधू किंवा तिच्या कुटुंबीयांकडून वर किंवा त्याच्या नातेवाईकांनी घेतलेली किंवा मागणी केलेली मालमत्ताच हुंडा मानली जाईल. या दुरुस्तीचा मुख्य उद्देश हुंडा देणाऱ्या कुटुंबाला कायदेशीर कारवाईच्या भीतीतून मुक्त करणे हा आहे, जेणेकरून ते न घाबरता तक्रार दाखल करू शकतील.

या महत्त्वपूर्ण कायदेशीर बदलावर आपली प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश धनावत यांनी सांगितले की, ‘‘हुंडा देणाऱ्याला गुन्हेगार न ठरवण्याचा प्रस्ताव पीडितांना पुढे येऊन तक्रार करण्यास प्रोत्साहित करणारा असला तरी, कायद्याचा मूळ उद्देश हुंड्याच्या प्रथेलाच आळा घालणे हा आहे. केवळ हुंडा घेणाऱ्यालाच जबाबदार धरणे आणि देणाऱ्याला पूर्णपणे वगळणे, हे या सामाजिक दुष्प्रथेविरुद्धच्या लढ्याला कमकुवत करू शकते. कायद्यात बदल करताना त्याच्या दूरगामी परिणामांचा सखोल विचार करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा कायद्याचा धाक कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.‘‘

सरकारी पक्षाने न्यायालयाला सांगितले की, या कायदेशीर बदलामुळे हुंड्याशी संबंधित अत्याचाराची तक्रार करणाऱ्यांची संख्या वाढण्यास मदत होईल. न्यायालयाने सरकारची बाजू ऐकून घेतल्यानंतर या प्रकरणात केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे आणि प्रतिज्ञापत्राद्वारे आपली भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी, राज्य सरकारने तक्रारी दाखल करण्यासाठी एक विशेष हुंडा प्रतिबंधक पोर्टल सुरू केल्याची माहितीही न्यायालयाला दिली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ फेब्रुवारी रोजी होणार असून, केंद्र सरकारच्या भूमिकेनंतरच या प्रस्तावित दुरुस्तीचे भवितव्य ठरणार आहे. तोपर्यंत, या प्रस्तावामुळे हुंडाविरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर काय परिणाम होईल, यावर देशभरात चर्चा सुरूच राहील.

# नोट घेऊन वोट देणे कधी बंद करणार?

निवडणुकीच्या काळात कोणताही राजकीय उमेदवार निवडणूक रिंगणात उतरायचे झाल्यास, सोबत भरपूर पैशाचे भांडवल घेऊनच निवडणूक रिंगणात पाय ठेवत असतो. कोणतीही निवडणूक असो, पैशाशिवाय लढवली जात नाही. ग्रामपंचायत असो, पंचायत समिती असो, जिल्हा परिषद असो, विधानसभा असो अथवा लोकसभा असो प्रत्येक निवडणुकीत उमेदवार पैशाचा धुरळा करतच असतात. निवडणूक जवळ येऊ लागली की, प्रचाराच्या तोफा बुलंद होतात, एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जातात. प्रत्येक उमेदवार आपल्या मतदारसंघात प्रचार सभा घेत असतो, आणि आपल्या भाषणातून पोकळ आश्वासनांचा भडीमार करत असतो. आतापर्यंत आम्ही काय केले आणि काय नाही केले? याचा लेखाजोखा मांडत असतात आणि भविष्यात काय करणार आहोत याचा वचननामा देत असतात. प्रत्येक उमेदवार आपल्या मतदार संघात पैशाचा पाऊस पाडत असतो. दारू, मटन व पार्ट्या चारत असतो. एकापेक्षा एक वरचढ पैसे वाटणारे उमेदवार निवडणूक काळात पैसे वाटताना आपण पाहिले असतील. एखाद्या उमेदवाराने मताला पाचशे रुपये दिले तर दुसरा उमेदवार मताला एक हजार रुपये देण्याची तयारी ठेवतो. म्हणजे निवडणूक लढवण्यासाठी प्रत्येक उमेदवारांमध्ये एकापेक्षा एक वरचढ पैसा वाटण्याची जणू स्पर्धाच लागलेली असते. मतदान दोन दिवसांवर येऊन ठेपले की, लगेच आमचे सुजान मतदार बंधू भगिनी कोणता उमेदवार पैसे घेऊन येईल याची रात्रभर वाट पाहत असतात. त्यासाठी आदल्या रात्री समाज बांधव रात्रभर जागरण करत असतात. कारण पैसा दिवसा वाटला जात नाही तर संध्याकाळी दिला जातो. आमचे मतदार बंधू भगिनी हजार पाचशे रुपयांसाठी उमेदवारांकडून पैसे घेऊन लाचार होताना मी पाहिले आहेत. राजकारणी लोकांनी पैसे देऊन मतदान विकत घेण्याची जणू परंपराच पाडली आहे. म्हणून मतदार बांधवांना पैसा घेऊन मतदान करण्याची सवय जडली आहे. कोणताच माणूस पैसा घेतल्याशिवाय मतदान करायला तयार नसतो. दारू, मटन, बिर्याणी आणि पैसा घेऊनच मतदार बंधू भगिनी मतदान करायला तयार होतात. जेवढे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरलेत, तेवढे उमेदवार एकापेक्षा एक वरचढ पैशाचा पाऊस पाडून मतदारांना मतदान करण्याची विनंती करतात. जो उमेदवार सगळ्या उमेदवारांपेक्षा अधिक पैसा देतो, त्या उमेदवाराला मतदान करण्याचा जनतेचा कौल दिसतो. निवडणूक काळात कार्यकर्त्यांची जणू सगीच असते. जो उमेदवार पैसे देऊन मतदान विकत घेतो तो उमेदवार निवडून आल्यावर विकास कामे करेल याची शाश्वती कोणीच देऊ शकत नाही. निवडून आलेला उमेदवार पाच वर्षे आपण जनतेला दिलेला पैसा आपल्या पदाच्या माध्यमातून कसा काढता येईल? ते पाहत असतो. जनता सुद्धा पैसे घेऊन व दारू मटन आणि पार्ट्या खाऊन लाचार झालेली असते. जनतेला विजयी उमेदवाराला सामाजिक विकास कामे करा म्हणून बोलण्यासाठी जराही तोंड नसते. निवडून आलेला पुढारी आपण दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्यात असफल ठरतो. कारण त्या उमेदवाराची सुद्धा काही चुकी नसते. त्याने निवडणूक लढवण्यासाठी मतदारसंघात भरपूर पैसा उधळलेला असतो. म्हणून तो निवडून आल्यावर विकास कामे न करता आपला गेलेला पैसा परत कसा मिळवता येईल? हे बघत असतो. मित्रांनो आपण पैसा घेऊन मतदान करत असाल तर आपला स्वाभिमान विकत आहात, असे समजा. ज्या माणसाला स्वाभिमान काय असतो? हे माहीत नाही तोच माणूस निवडणुकीत पैसे घेऊन मतदान करतो. हल्ली पैसे न घेता मतदान करणारे लोक मतदारसंघात फार कमी झाले आहेत. आणि पैसे घेऊन मतदान करणाऱ्या लोकांचा सुळसुळाट वाढला आहे. गोरगरीब, कष्टकरी, कामगार, वंचित आणि उपेक्षित माणसेच निवडणुकीत पैसे घेतात असे नाही, तर श्रीमंत नोकरदार आणि भरपूर पैसा व संपत्ती असणारे लोक सुद्धा उमेदवाराकडून पैसे घेताना दिसतात. आजकाल माणसे खूप शिकली, मोठमोठ्या पदावर दिमाखात विराजमान झाली, तरीसुद्धा माणसांना मतदानाची किंमत अजूनही कळाली नाही. एक वेळ गोरगरीब सामान्य जनतेने उमेदवाराकडून पैसे घेतले तर ती गोष्ट तेवढी चिंताजनक नाही. परंतु ज्या माणसाकडे भरपूर पैसा आहे, तो मोठ्या पदावर अधिकारी आहे, तरीसुद्धा तो माणूस उमेदवाराकडून पैसे घेत असेल तर त्या माणसाच्या शिक्षणाला आणि नोकरीला काय चुलीत घालायचे आहे का? महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहिताना समस्त मानव जातीचा विचार करून प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार देऊन या देशाची शासनकर्ती जमात बनवले आहे. माणूस झोपडीत राहणार असो, महालात राहणार असो, रस्त्याच्या कडेला पालात राहणार असो किंवा कोणत्याही जाती धर्माचा असो, प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार देऊन या देशात समता, बंधुता, मानवता व एकता रुजवण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मताची किंमत मीठ मिरच्या एवढी समजू नका. ज्या दिवशी तुम्हाला मताची किंमत कळेल त्या दिवशी तुमच्या एवढा कंगाल माणूस कोणीच नसेल. म्हणून म्हणतो, मताची किंमत अनमोल व मौल्यवान आहे. जो उमेदवार निवडणुकीत एका मताने पराभूत होतो, त्या उमेदवाराला मताची किंमत काय असते? ते विचारा. बाबासाहेबांनी तुम्हाला मतदान विकण्यासाठी मतदार केले नाही, तर योग्य उमेदवार निवडून सामाजिक विकास कामे करण्यासाठी कटिबद्ध असणारा उमेदवार निवडून देण्याचे बाबासाहेबांचे आवाहन होते. परंतु लोकांना अजूनही बाबासाहेबांनी दिलेल्या मतदानाची किंमत नीट समजली नाही. ज्या दिवशी आपल्याला बाबासाहेबांनी दिलेल्या मताची किंमत कळेल त्या दिवशी आपण आपले मतदान कधीच विकणार नाहीत. उलट पैसे देणाऱ्या उमेदवाराला आपल्या दाराला सुद्धा उभे टाकू देणार नाहीत. ज्या दिवशी देशात पैसे घेऊन मतदान करण्याची पद्धत बंद होईल, त्या दिवशी या देशाचा खरा विकास होईल. जो उमेदवार खरोखरच जनहितासाठी व देशहितासाठी निवडणूक लढवतो तो उमेदवार कधीच पैसा वाटत नाही. तो निवडून आल्यावर जनहिताची कामे केल्याशिवाय स्वस्त बसत नाही. परंतु आपण पैसे न वाटणाऱ्या उमेदवाराला डावलून पैसे देणाऱ्या उमेदवाराला विजयी करतो. आणि मग आपण सरकारला दोष देतो. त्यांना विकास कामे करा म्हणायला आपल्याला तोंड तरी असेल का? जोपर्यंत पैसे घेऊन मतदान करणे ही प्रथा बंद होणार नाही तोपर्यंत समाजाचा, शहराचा व देशाचा विकास होणे शक्य नाही. ज्या दिवशी समाजातील समस्त लोक एकत्र येऊन पैसे वाटणाऱ्या उमेदवाराला धुडकावून लावतील आणि पैसे न वाटणाऱ्या परंतु राजकीय क्षेत्राची पुरेपूर जाण असणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवाराला आपण निवडून द्याल, त्या दिवशी आपल्या समाजाचा, शहराचा व देशाचा विकास झाल्यावाचून राहणार नाही. मतदारांनी उमेदवाराला दारू, मटण व पार्ट्या मागणे बंद करावे. समाजातील सर्व लोकांनी एकत्र येऊन मताला पैसे न मागता आमच्या समाजाची विकास कामे करा म्हणून त्यांना ठणकावून सांगितले पाहिजे. तरच निवडून आल्यावर उमेदवार विकास कामे करतील... अन्यथा आपण पैसाही घ्यायचा आणि विकास कामे करा म्हणून सांगायचे, हे असे कसे चालणार हो? जो उमेदवार खूप कमी वयातच सामाजिक चळवळीत व समाजकार्यात स्वतःला झोकून देऊन काम करत आलेला आहे, जो उमेदवार चारित्र्यवान, कर्तृत्ववान, निष्कलंक व निष्कपट आहे व त्याला सामाजिक कार्य करण्याची खूप आवड आणि राजकीय क्षेत्राची पुरेपूर जाण आहे, तोच उमेदवार कोणताच राजकीय वारसा नसताना निवडणुकीला पहिल्यांदाच उभा राहिला असेल तर त्या गरीब, होतकरू व सर्वसामान्य उमेदवाराला आपण प्रचंड मतांनी निवडून देणे व विकासाची गंगा आपल्या समाजात व शेत शिवारात खेचून आणायला लावणे आपले काम आहे. त्यासाठी आपल्याला पैशाकडे न बघता माणसाकडे बघून त्याला निवडून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. थोड्याफार पैशाला, दारू व मटणाला आणि त्यांच्या पोकळ आश्वासनांना व त्यांच्या भुलतापांना बळी पडून आपले अमूल्य मत त्यांना विकणे म्हणजे आपण लोकशाहीचा आणि घटनाकाराचा घोर अपमान केल्यासारखा आहे. त्यासाठी समस्त जनतेला माझी कळकळीची नम्र प्रार्थना आहे की, बांधवांनो आपण आपले अमूल्य मत दीडदमडीवर न विकता उच्चशिक्षित व राजकीय क्षेत्राची जाण असणाऱ्या लायक उमेदवाराला मतदान रुपी आशीर्वाद देऊन त्याला सामाजिक कार्य करण्याची संधी द्यावी... ते नक्कीच आपल्या संधीचे सोने करून आपल्या दारापर्यंत आणि शेत शिवारापर्यंत विकासाची गंगा आणल्याशिवाय राहणार नाहीत, त्यासाठी गरज आहे ती, नोट घेऊन वोट देणे ही प्रथा बंद करण्याची...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## पान १ वरुन

### पर्यावरण संवर्धनासाठी ...

असून, ज्ञान, विज्ञान व अध्यात्म यांची सांगड घालत विज्ञाननिष्ठ, विवेकी व सुजाण समाज घडविण्याचा ध्यास घेतला आहे. स्वच्छ पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शेतीपूरक उद्योग, स्वच्छता अभियान व पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांत प्रभावी काम करण्याचे नियोजन मंडळाने केले आहे.

तसेच गावात दुधगंगा वाढीस लागावी यासाठी गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या यांसारखी दुभती जनावरे खरेदी करण्यासाठी मार्गदर्शन व मदत, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, शेतीपूरक व्यवसाय उभारणी आणि स्थानिक उत्पादनातून आर्थिक सुबत्ता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या सर्व उपक्रमांसाठी मंडळाला ग्रामस्थांचे उत्तम सहकार्य लाभत असून, युवकांच्या या विधायक चळवळीमुळे पेगर गव्हाण गाव लवकरच विकासाचा आदर्श नमुना बनेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### इन्स्टीट्युट ऑफ ...

अमृत तारो, प्रा.योगीराज मुळे, प्रा.अविनाश हटकर, प्रा.कोमल जैस्वाल, प्रा. सचिन डिघोळे, प्रा. सौरभ बोंद्रे, प्रा.साक्षी जाजू,यांनी त्यांचे कौतुक केले असून, त्यांच्या कुटुंबीयांनी, संशोधन मार्गदर्शकांनी, प्राध्यापकांनी तसेच मित्रपरिवार व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### जालना जिल्ह्यात ...

यांची प्रशिक्षणासाठी
निवड केली जाणार आहे. या प्रशिक्षण दरम्यान १000 कर्मचारी प्रत्येकी १0 प्रमाणे आपल्या गावातील माता बाळाची जोड़ी दत्तक घेवून त्यांना समुपदेशन करतील व त्यांच्यात प्रगति घडवून आणतील. व कार्यक्रमाअंती या १000 कर्मचारी यांच्या मधून २५0 मास्टर ट्रेनर्सची जिल्हा स्तरावर निवड केली जाणार आहे. त्यानंतर हे जिल्हा स्तरीय तज्ञ मार्गदर्शक जिल्ह्यातील सर्व मातांना प्रशिक्षणा अनुसार समुपदेशन करणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी याचा फायदा घ्यावा व आपल्या बाळाचा शारीरिक मानसिक बौद्धिक विकासामध्ये हातभार लावावा.

हेल्थ स्पोकन ट्युटोरियल आणि विल्स ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने कुपोषण, माता मृत्यू व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे, गरोदर,स्तनदा माता व 0 ते ५ वयोगटातील मुलांना पौष्टिक आहार या विषयावर राज्य प्रकल्प प्रमुख संदीप रंजना यांनी सादरीकरण केले. या कार्यशाळेस सर्व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी,एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती.

### माणसाच्या मनाला ...

श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती शिकवले जात असून श्रमदानाचे महत्व समजते, श्रम हेच खरे दैवत आहे असेही प्रा.डॉ.

सोनवणे यांनी सांगितले. यावेळी बद्रीनारायन बारवाले विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली सोलाट यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे म्हणाले की, युवकांनी जीवनामध्ये राष्ट्रसेवेचा संकल्प केला पाहिजे राष्ट्रीय सेवा योजनेतून राष्ट्रीय एकात्मतेचे अखंड दर्शन घडते . राज्यस्तरीय व राष्ट्रीय शिबिरातून राष्ट्रीय भाषांचे आदान प्रदान होते एकमेकांच्या संस्कृती चे दर्शन होते. राष्ट्रीय सेवा योजनेतून मानवतेचा संदेश मिळतो माणसाच्या मनाला मनाशी जोडण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते माणूस जोडला गेल्या की देश जोडला जातो. युवकांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते,पुढे हेच युवक राष्ट्रासाठी काम करतात , भारतीय खेड्यांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक विषयावर आतापर्यंत प्रबोधन झाल्याचेही प्रा.डॉ.खाडे यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांनी उद्योगाचे धडे घेऊन ,उद्योग क्षेत्राकडे वळावे.तुझ आहे तुझं पाशी तुझं नसे ठाव... अशी आपली सध्याची स्थिती झाल्याचे ही त्यांनी सांगितले. युवकांनी टाकाऊ पासून टिकाऊ बनवले पाहिजे. घराघरात स्वच्छतेचे महत्व पटवून सांगितले पाहिजे. स्वच्छ घर असेल तर जीवन निरोगी राहील असेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राजेश सरकटे, प्रा किशोर तापडिया, प्रा डॉ गणेश कुलकर्णी ,प्रा डॉ सुनील इंदुरकर, प्रा. डॉ. गणेश रोकडे, प्रा. उषा चौधरी, प्रा. अमृता धावणे, प्रा. ऐश्वर्या तोटे, प्रा. तारो, आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. योगेश लाहामटे यांनी व्यक्त केलेत. या कार्यक्रमास मांडवा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स. भु. प्रशालेतील सर्वेश मगरेला संस्कृत ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील श्री स. भु. प्रशाला येथे अखिल भारतीय संस्कृत ऑलिम्पियाड परीक्षा २०२५ दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल २४ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाला. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी शाळेत आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.



या परीक्षेसाठी शाळेतील इयत्ता आठवी ते दहावीचे एकूण ७६ विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता आठवीतून ७ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक, २ विद्यार्थ्यांनी रजत पदक, तर २ विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ३०० रुपयांचे पारितोषिक मिळवले. इयत्ता नववीतून ३ विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले. यामध्ये सर्वेश मगरे याने इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांमधून तसेच संपूर्ण शाळेतून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले. नववीतील इतर ४ विद्यार्थ्यांना रजत पदक, तर १ विद्यार्थ्याला ३०० रुपयांचे पारितोषिक मिळाले.

इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनीही घवघवीत यश मिळवत ६ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक, तर ५ विद्यार्थ्यांनी रजत पदक पटकावले. विशेष बाब म्हणजे या परीक्षेत एकूण २५ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळवले असून, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. बिरहारे सर, उपमुख्याध्यापक श्री. पाडळे सर, पर्यवेक्षक श्री. देशमुख सर तसेच सर्व शिक्षकवृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना या यशासाठी श्रीमती सोनवणे मॅडम व श्रीमती डेकाटे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, असे शाळेच्या वतीने नमूद करण्यात आले.

### महात्मा गांधी स्मृतिदिनानिमित्त जालना जिल्हा गांधी विचार पथच्या वतीने भावपूर्ण प्रार्थना सभा

# गांधी हा विचार असून तो कधीही संपणार नाही प्रा. सत्संग मुंढे

**जालना । प्रतिनिधी -** आज दि. ३० जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त जालना जिल्हा गांधी विचार पथक यांच्या वतीने जालना शहरातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर भावपूर्ण प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवर, नागरिक, विद्यार्थी व विद्यार्थीनींनी त्यांना आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाची सुरुवात वैष्णव जन तो, रघुपती राघव राजा राम, मेरे देश में तू, मेरे भेष में तू या गांधीवादी प्रार्थनांनी करण्यात आली. या प्रार्थनांम धून अहिंसा, सत्य, बंधुता, समता आणि मानवतेचा संदेश देत गांधीजींच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, आश्लेषा इंग्लिश स्कूल व शिवाजी विद्यालय येथील विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी प्रार्थना सादर करत 'एक रुपया चांदी का, देश हमारा गांधी का' अशा गगनभेदी घोषणा देत संपूर्ण परिसर गांधीमय केला.

कार्यक्रमात बोलताना प्रा. सत्संग मुंढे यांनी सांगितले की, ''गांधी हा केवळ व्यक्ती नव्हता तर तो एक विचार आहे. हा विचार सत्य, अहिंसा व मानवतेवर आधारित असून तो कधीही संपणार नाही. आजच्या काळात तरुण पिढीने गांधीजींच्या विचारांचा अंगीकार करून समाज परिवर्तनासाठी पुढे यावे,'' असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी स्वर्गीय अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटांचे मौन पाळत श्रद्धांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमास कॉ. अण्णा सावंत, प्रा. सत्संग मुंढे, प्राचार्य डॉ. जवाहर काबरा, योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. रामनाथ पालवे, रा.से.यो. जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. विठ्ठल गाडेकर, आकाश उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.



डी. के. कुलकर्णी, प्रा. यशवंत सोनुने, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, श्री. मिर्झा अफसर बेग, राष्ट्रीय सेवा गायकवाड यांच्यासह शहरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने शांततेच्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे शहरात गांधीजींच्या विचारांचे स्मरण आणि जागृती झाली.

# शाहिरीचा साज अन् लोककलेचा आवाज; जेईएस मध्ये आज रंगणार रंग शाहिरीचे!

### शाहीरी प्रशिक्षण शिबिराचा आज मान्यवर शाहीरांच्या उपस्थितीत समारोप

**जालना । प्रतिनिधी** - सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि येथील जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागातर्फे आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा आज शनिवारी (दि. ३१) दिमाखदार समारोप होणार आहे. सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या चुन्नीलालजी जी. गोयल सभागृहात हा सोहळा रंगणार असून, यावेळी प्रशिक्षित विद्यार्थ्यांच्या दमदार सादरीकरणातून 'रंग शाहिरीचे' हा विशेष कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

या समारोप समारंभासाठी लोककलेतील दिग्गज व्यक्तिमत्त्वांची उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील प्रख्यात ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर तसेच विनोद सम्राट व शाहीर रत्न रमेश गिरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून नवोदित कलावंतांना मार्गदर्शन करणार आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांनी शाहिरीचे बारकावे आत्मसात केले आहेत. उद्याच्या समारोप प्रसंगी हे विद्यार्थी आपल्या कलेचा आविष्कार सादर करतील. यामध्येः वीररसाने ओथंबलेली शाहिरी व शिवगीते. सामाजिक प्रबोधनपर पोवाडे आणि लोकगीते. छंद-प्रास आणि लोकवाद्यांच्या जुगलबंदीतून उलगडणारे लोकजीवन.

या शिबिरादरम्यान प्रशिक्षणार्थींना शाहिरी लेखन, सादरीकरण कौशल्य आणि मंचावरील तंत्रांचे सखोल मार्गदर्शन तज्ज्ञांकडून देण्यात आले आहे. महाराष्ट्राची समृद्ध शाहिरी परंपरा जपली जावी आणि नवीन पिढीतील शाहीर घडावेत, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

शहरातील रसिक प्रेक्षक, नागरिक आणि विद्यार्थ्यांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवोदित शाहिरांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. यशवंत सोनुने आणि शिबिर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार यांना जालना जिल्हाधिकारी कार्यालयात आज दि.३० जानेवारी २०२६ रोजी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करत सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी आमदार हिकमत उढान, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, नायब तहसीलदार तुषार निकम, सतीश तायडे, सुनिल काळुंखे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी बैठकीस अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव मनिषा देशपांडे, पोलीस उपअधिक्षक रविंद्र निकाळजे, कृषी उपसंचालक एस.एच. कायंदे, अन्न व औषध सहा. आयुक्त निखील कुलकर्णी, वैधमापनचे आर.डी. दराडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे अनिल कदम, महावितरणचे चेतन पाटील, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी डी.एस. दिवटे यांच्यासह अशासकीय सदस्यांची बैठकीस उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, नागरिकांना दैनंदिन व्यवहारात येणाऱ्या अडचणी किंवा समस्यांबाबत उपाय योजना करण्यासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेमार्फत प्रयत्न होणे आवश्यक आहे. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच ग्राहकांच्या तक्रारी त्वरित सोडविण्याचे आहे. याकरीता जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेने ग्रामीण भागात विविध माध्यमातून ग्राहक जनजागृतीसाठी विशेष म ोहीमद्वारे प्रयत्न करावा. ग्राहकांना काही अडचणी असल्यास त्याबाबत जालना जिल्ह्याचे संकेतस्थळ .. यावर ग्राहकांच्या तक्रारीसाठी पोर्टल उपलब्ध करुन दिलेले असून, नागरिकांनी त्यांच्या समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर कराव्यात,




यावेळी अशासकीय सदस्यांनी बैठकीमध्ये विविध विषयाच्या तक्रारी मांडल्या याम ध्ये जिल्ह्यातील काही भागातील औषधी दूकानदार हे काही निवडक डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शन असेल तरच औषधी देतात. तसेच शहर व ग्रामीण भागत अनधिकृत वैद्यकीय व्यावसायीक (बोगस डॉक्टर) असल्याची तक्रारी आहेत. याकरीता जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील औषध दूकाने आणि बोगस डॉक्टरांचा शोध घेवून कार्यवाही करावी. तसेच अन्न औषध प्रशासनाने भेसळयुक्त खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करावी. ग्राम ीण भागातील आठवडी बाजारात विक्रेते दगडाचे माप वापरतात, अशा विक्रेत्यांची तपासणी करुन वैधमापन विभागाने कारवाई करावी. परतुर येथील राशन दुकानामधुन मानकांप्रमाणे धान्य वितरीत होत नसल्याने अशा दूकानांची तपासणी करावी. जिल्ह्यातील रस्त्यांवरील दूभाजक अनाधिकृतपणे तोडण्यात आलेले आहेत. त्याचा शोध घेवून योग्य कार्यवाही करावी. शहरातील विविध रस्त्यावरील सिग्नलच्या वेळा रस्यांतरवर होणाऱ्या वाहनांची वाहतूकीचे अभ्यास करुन योग्य कार्यवाही करावी. रस्याांणवरील दूभाजकांवर विविध प्रकारचे फलक लावल्याने अपघात होण्याची शक्यता असते, अशा फलकांबाबतीत कार्यवाही करावी. जालना येथील न्यू मार्केट यार्ड समोरील रस्त्यावर गतिरोधकाची आवश्यकता आहे का ? याची पाहणी करुन परिवहन कार्यालयाने आवश्य ती कार्यवाही करावी. तसेच वेळोवेळी टॅक्स भरुन ही जालना मार्केट कमिटी परिसरातील स्वच्छता होत नाही. मार्केट यार्ड महावितरणने स्म ार्ट मिटर संबंधी प्राप्त तक्रारीचे निवारण करावे. बदनापुर वाहन थांब्याजवळ विद्युत पोल लावले ते तपासुन घेणे. तसेच ग्राहकांनी महावितरण संबंधधी तक्रारी १९१२ आणि १८००२१२३४३५ यावर नोंदवावी. तसेच आजच्या बैठकीत अशासकीय सदस्यांनी मांडलेल्या तक्रारींची दखल घेवून, याबाबत योग्य कार्यवाही करुन, अहवाल सादर करण्याच्या सूचना यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या.

बैठकीच्या सुरुवातीस प्र. जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव मनिषा देशपांडे यांनी प्रास्ताविकात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे उद्दीष्ट सांगुन मागील बैठकीबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती दिली. तसेच जिल्ह्याच्या ऑनाईलन पोर्टलवर म ागील महिन्यात एकही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे सांगुन, तक्रारी ऑनलाइन नोंदवाव्यात. तसेच .. या संकेतस्थळावर ग्राहकांच्या सम स्यांसाठी पोर्टल उपलब्ध आहे. ग्राहकांच्या हिताशी संबंधित तक्रारी असल्यास त्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन केले.

---

### मालमत्तेसाठी सख्खा भाऊ झाला पक्का वैरी

# जिवे मारण्याची दिली धमकी ;जवाहरबाग परिसर हादरला

### सदर बाजार पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्यावर न थांबता, वृद्धाच्या सुरक्षिततेसाठी कडक भूमिका घ्यावी

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील जवाहरबाग परिसरात मालमत्तेच्या वादातून सख्ख्या भावानेच वृद्ध भावाला शिवीगाळ व मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. कौटुंबिक वाद आता थेट हिंसक टप्प्यावर पोहोचल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणातील फिर्यादी कपील कर्दमऋषी व्यास (वय ७२), व्यवसाय पूजापाठ, रा. जवाहरबाग, जालना असून आरोपी प्रकाश कर्दमऋषी व्यास हा त्यांचा सख्खा भाऊ आहे. दि. २५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १.१५ वाजेच्या सुमारास जवाहरबाग, जालना येथे मालमत्तेच्या वादातून आरोपीने फिर्यादीस अश्लील शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता तुला जिवंत सोडणार नाही अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या घटनेमुळे वृद्ध व्यक्ती मानसिकरीत्या भयभीत झाल्याचे सांगितले जात असून, घरगुती वादातून वृद्धांवर होणाऱ्या अत्याचाराचा हा गंभीर प्रकार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात .. . ८३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () २०२३ मधील कलम ११५ (२), ३५१ (२), ३५२ अंतर्गत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. प्रकरणाची नोंद पोहेक/९३ आगळ यांनी केली असून, पुढील तपास पाहेक/३२७ लिहीणार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मालमत्तेच्या वादातून सख्ख्या भावाकडून वृद्ध भावावर हात उचलला जातो, हे केवळ कायद्याच्या दृष्टीनेच नव्हे तर सामाजिक दृष्टिकोनातूनही अत्यंत गंभीर आहे. घरगुती वाद सोडवण्यासाठी कायदा असताना हिंसाचाराचा मार्ग का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. या प्रकरणात केवळ अदखलपात्र गुन्ह्यावर न थांबता, पीडित वृद्धाच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने प्रतिबंधात्मक व कडक भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

---

### राज्यपाल बागडे यांच्याहस्ते विजयअण्णांचा सन्मान सोहळा

# नियोजित कार्यक्रम पुढे ढकलला

**जालना । प्रतिनिधी -** रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. आयोजित जालना गौरव पुरस्कार वितरण व सन्मान सोहळा हा नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय जालना ज्येष्ठ नागरिक मंचच्या कार्यकारिणीने घेतला आहे .

याविषयी अधिक माहिती अशी की , जालना ज्येष्ठ नागरिक मंचने यावर्षीपासून सामाजिक कार्यात समर्पित भावनेने योगदान देणा-या जिल्ह्यातील महनीय व्यक्तिमत्वाची निवड करुन त्यांना जालना गौरव पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला. यंदा पहिल्या पुरस्कारासाठी मंचतर्फे सर्वसंमतीने मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे सचिव तथा कृषिरत्न श्री .विजयअण्णा बोराडे यांची निवड करण्यात येऊन तशी जाहीर घोषणाही करण्यात आली . दरम्यान , मंचने या पुरस्कार वितरण व सन्मान सोहळा कार्यक्रम ासाठी राजस्थानचे राज्यपाल श्री हरिभाऊ बागडे व कृषिरत्न श्री.विजयअण्णा बोराडे यांची तारीख व वेळ घेऊन कार्यक्रमाचे नियोजन तथा जय्यत तयारी देखील सुरु केलेली होती . येथील जेईएस महाविद्यालयात या नियोजित कार्यक्रमाची सर्व तयारी पूर्णत्वास येत असतांनाच महाराष्ट्रावर आघात करणारी विमान दुर्घटनेची दुर्दैवी बातमी आली. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने महाराष्ट्रावर शोककळा पसरलेली असतांना हा नियोजित कार्यक्रम घेणे उचित नसल्याने तो पुढे ढकलण्याचा निर्णय मंचतर्फे कळविण्यात आला आहे .

पुढील तारीख यथावकाश सर्वांना कळविली जाईल, असे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.रावसाहेब ढवळे यांनी सांगितले.

---

# जालना समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** दि. ३० जानेवारी २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के हे उपस्थित होते कार्यक्रमात सर्वप्रथम प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी रमेश गजर,डॉ. मधु खोब्रागडे व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. दीपक बुक्तरे,प्रा. डॉ.नरसिंग पवार, प्रा डॉ रेणुका बडवणे. प्रा.डॉ.बालाजी मुंडे,प्रा.डॉ. प्रवीण कणकुटे,प्रा.डॉ.मीना बोर्डे,विष्णु भोसले, रामू एखण्डे, संजय गोरे,संदेश चव्हाण,ज्ञानेश्वर इंदलकर, संभाजी तौर आदी उपस्थित

---

# राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त कर्करोग विषयक मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**आनंदवन । वरोरा । प्रतिनिधी** - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा येथे कर्करोग विषयी जनजागृती व म ार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रम ात उपस्थित सर्व मान्यवरांनी कर्करोग प्रतिबंध, लक्षणे व उपचाराविषयी सखोल म ार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. संजय साबळे होते, तर उपप्राचार्य प्रा. राधा सवाने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. संजय साबळे सर यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या आरोग्यविषयक विचारांचा उल्लेख करत आरोग्याबाबत जागरूकता ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. उपप्राचार्य सौ.राधा सवाने यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कार्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले तसेच कॅन्सर हा आजच्या काळातील एक गंभीर पण वेळेवर ओळख आणि योग्य उपचारांनी बरा होऊ शकणारा आजार आहे. अस्वास्थ्यकर जीवनशैली, तंबाखू-व्यसन, प्रदूषण व ताणतणाव ही कॅन्सरची प्रम ुख कारणे आहेत. नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, व्यायाम आणि व्यसनमुक्त जीवनशैली यामुळे कॅन्सरपासून बचाव होऊ शकतो असे सांगितले. प्रमुख मार्गदर्शक सूरज साळुंखे टाटा ट्रस्ट यांनी कर्करोगाची प्राथमि



क लक्षणे, वेळेवर तपासणीचे महत्त्व व जीवनशैलीतील बदल याबाबत माहिती दिली. तसेच काजल विस्वास टाटा ट्रस्ट यांनी महिलांमधील कर्करोग, त्याची कारणे व प्रतिबंधात्मक उपाय यावर सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली.कॅन्सरबाबत भीती न बाळगता जागरूकता निर्माण करणे आणि रुग्णांना म ानसिक आधार देणे ही आपली सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा. सुरेश राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. नीरज आत्राम, रासेयो +२ कार्यक्रम अधिकारी यांनी उपस्थित म ान्यवरांचे व सहभागी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रम ाला प्राचार्य डॉ.मृणाल काळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रा. किशोर गावंडे, प्रा.हितेश घुगल

प्रा.स्मिता बडोले,आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

---

# अन्याय अत्याचार निवारण समिती नाशिक जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीमती जान्हवी जाधव यांची नियुक्ति



**दिंडोरी । प्रतिनिधी** - जनकल्याण मराठी पत्रकार संघ संचलीत अन्याय अत्याचार निवारण समिती नाशिक जिल्हा उपाध्यक्ष पदी जान्हवी जाधव यांची नुकतीच नाशिक येथे झालेल्या बैठकीत नियूक्ती करण्यात आली आहे.

नाशिक येथील शासकीय विश्रामगृह येथे पार पडलेल्या बैठकी प्रसंगी,जनकल्याण मराठी पत्रकार संघ संस्थापक अध्यक्ष संतोष जाधव, राष्ट्रीय कार्य अध्यक्ष रफीक सय्यद, राज्य कार्य अध्यक्ष सुधीर उमराळकर,महिला राज्य अध्यक्षा सौ मनिषा पवार, अन्याय अत्याचार निवारण समिती राज्य अध्यक्षा सौ. कल्याणी धोंडगे यांच्या हस्ते श्रीमती जान्हवी जाधव यांची जनकल्याण मराठी पत्रकार संघ संचलीत अन्याय अत्याचार निवारण समितीच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी राज्य सचिव अन्वर पठाण, राज्य प्रमुख सल्लागार बाळासाहेब अस्वले, राज्य उपाध्यक्ष -सुकदेव खुर्दळ उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष -प्रकाश बागुल, श्रीमती लोखंडे ,अखिलेश पटेल आदीसह पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

श्रीमती जान्हवी जाधव यांनी महाराष्ट्र राज्यात अन्याय अत्याचार व प्रश्न सोडवण्यासाठी आहोरात्र योगदान दिले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन जनकल्याण मराठी पत्रकार संघ संचलीत अन्याय अत्याचार निवारण समितीच्या कार्यकारणी मध्ये सहभागी करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



**गाजियाबाद (यू.पी) येथिल प्रसिद्ध सदगुरु साक्षीश्री महाराज यांच्याशी आध्यात्मिक चर्चा करताना भक्तमाल कथा प्रवक्ता किशोरजी तिवारी, जालना शिवसेना शहर अध्यक्ष विष्णुभाऊ पाचफुले, सीए गोविंदप्रसाद मूंदड़ा, सामाजिक कार्यकर्ता मेघराज चौधरी, उद्योगपति डूंगरसिंह राजपुरोहित, मनोज दायमा, रामेश्वर जोशी, कुलदीप राजपुरोहित, सूरज तिवारी, राजवीर राजपुरोहित वरील छायाचित्रात दिसत आहे.**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.